पुण्यनगरी, कोल्हापूर
9.10.2015

# कचरा निर्गतीसाठी लोकसहभाग आवश्यक

## आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव उद्‌घाटनप्रसंगी डॉ. दिलीप बोरालकर यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

घनकचऱ्याबाबत सर्वांच्याच चुका झाल्या आहेत. यांत शासन, प्रशासनाच्या नियोजनाप्रमाणे काम झालेले नाही हे स्पष्टच आहे. पर्यावरण रक्षणाची चळवळ लोकसहभागातून यशस्वी होते, याचा अनुभव असल्याने कचरा निर्गतीसाठी तसा प्रयत्न झाला पाहिजे, असे मत प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निवृत्त सदस्य सचिव डॉ. दिलीप बोरालकर यांनी व्यक्त केले.

कलामहर्षी बाबूराव पेंटर फिल्म सोसायटी आणि किर्लोस्कर उद्योग समूहाच्या वतीने शाहू स्मारक भवन येथे सुरू झालेल्या सहाव्या वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन करताना डॉ. दिलीप बोरालकर. सोबत आर. आर. देशपांडे, चंद्रकांत जोशी, दिलीप बापट यांच्यासह अन्य मान्यवर. (छाया : अमर कांबळे)

अध्यक्षस्थानी किर्लोस्कर'चे जॉईंट मॅनेजिंग डायरेक्टर आर. आर. देशपांडे होते.

घनकचऱ्याबाबत सर्वांचेच अंदाज चुकले, असे कबूल करत ते म्हणाले, 'घनकचऱ्याची वर्गवारीनुसार विभागणी करायची आणि त्यातून पुनर्निर्माण, खतनिर्मिती, नष्ट न होणाऱ्या ठराविक जागेत टाकायचा असे नियोजन ऐकायला चांगले वाटत असले तरी प्रत्यक्षात तसे झाले नाही. एकाच कंपनीला कचरा उठावापासून विल्हेवाट लावण्यापर्यंतचे काम सोपविण्यात आले. त्यांचा खर्च त्यांनीच करावा अशा नियोजनाने हा प्रयोग फसला, महापालिका क्षेत्रात कचऱ्याचा प्रश्न गंभीर आहे.'

देशपांडे म्हणाले, 'पर्यावरणातील विविध घटकांचे महत्त्व सांगणे आणि त्याबद्दलच्या जाणिवा निर्माण करण्याचा उद्देश या महोत्सवाचा आहे. हा केवळ उत्सव न राहता एक चळवळ बनली आहे, हे अभिमानास्पद आहे.' कुंडीतील रोपाला पाणी आणि खत घालून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. स्वागत कृष्णा गावडे यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत रोप देऊन प्रकाश राव यांनी केले.

प्रास्ताविक चंद्रकांत जोशी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय उदय गायकवाड यांनी करून दिला. आभार राहुल पवार यांनी मानले. महोत्सवाचा प्रारंभ 'फिश' या लघुपटाने झाला.

### वसुंधरा मित्र, वसुंधरा गौरव पुरस्कारांचे आज वितरण

वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांतर्गत निसर्गरक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्था, व्यक्ती यांचा गौरव केला जातो. या वर्षी पराग केमकर, राजा उपळेकर यांच्यासह ग्रीन गार्डस् या संस्थेला 'वसुंधरा मित्र' पुरस्कार देण्यात येणार आहे, तर आदर्श सहेली मंच, युवक मित्र मंडळ, कोल्हापूर अग्निशामक दल यांना 'वसुंधरा गौरव' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे वितरण दि. ९ रोजी सायंकाळी ६.३० वाजता मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.